6:36



# अल्पकालीन अभ्यासक्रम

## राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांची सूचना

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** राज्यातील सर्व कुलगुरूंची बैठक घेऊन सर्व विद्यापीठांमध्ये सायबर सुरक्षेबाबत अल्पकालीन अभ्यासक्रम राबविण्याची सूचना राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी रविवारी केली. या अभ्यासक्रमामुळे सायबर योद्ध्यांची एक नवीन पिढी तयार होईल, असेही ते म्हणाले.

'क्विक हील फाउंडेशन'च्या वतीने आयोजित 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा अवॉर्ड्स' कार्यक्रमात राज्यपाल बोलत होते. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर, महाराष्ट्र सायबरचे उपमहानिरीक्षक संजय शिंत्रे, 'क्विक हील फाउंडेशन'च्या अध्यक्षा अनुपमा काटकर, 'क्विक हील टेक्नॉलॉजीज'चे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. कैलास काटकर, सह व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजय काटकर, मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल साळवी यांच्यासह विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थी या वेळी उपस्थित होते.

स्वामी विवेकानंद यांना अभिवादन करून राधाकृष्णन म्हणाले, 'स्वामी विवेकानंदांची शिकवण लाखो लोकांना, विशेषतः तरुणांना, धैर्याने, शहाणपणाने आणि नेतृत्व करण्यासाठी प्रेरणा देत आहे. क्विक हील फाउंडेशनने २०१६ पासून हा कार्यक्रम सुरू करून आतापर्यंत ५४ लाख लोकांपर्यंत सायबर सुरक्षेबद्दल जागरूकता केली आहे. समाजातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत घटकातील विद्यार्थ्यांना सहभागी करून घेण्यावर आणि सायबर-सुरक्षित समाज निर्माण करण्यासाठी त्यांना सक्षम करण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. या फाउंडेशनबरोबर जोडले जात तळागाळापर्यंत काम केलेले सर्व 'सायबर वॉरियर्स' कौतुकास पात्र आहेत.

सायबर सुरक्षा ही भारतासह जगभरातील सर्वात गंभीर चिंतांपैकी एक म्हणून उदयास आल्याचे सांगून राधाकृष्णन म्हणाले, 'तंत्रज्ञान पुढे जात असताना चुकीचे काम करणारे लोकदेखील वाढत आहेत. तथापि, त्यांची साखळी तोडणे आणि त्यांना पकडण्याचे कामदेखील आपल्याला करावे लागणार आहे. सायबर गुन्हेगारीत स्थिर गतीने वाढ होत आहे. त्यामुळे प्रत्येकाला सायबर गुन्हेगारीचे ज्ञान असणे आवश्यक आहे.'

राज्यपाल राधाकृष्णन यांच्या हस्ते सायबर शिक्षा फॉर सायबर सेक्युरिटी उपक्रमात उत्कृष्ट काम केलेल्या प्राचार्य, शिक्षक, विद्यार्थी यांना सायबर वॉरियर्स पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. अनुपमा काटकर यांनी आपल्या मनोगतामध्ये फाउंडेशनच्या कामाची माहिती दिली.

### पोलिसांना ज्ञान देणे गरजेचे

'शासनाच्या सायबर शाखेतील पोलिसांनाही सायबर गुन्हेगारीच्या विरोधात कसे काम करता येईल, यासाठी संगणक यंत्रणेचे पुरेसे ज्ञान देण्यासाठी प्रशिक्षण देण्याची गरज आहे. सायबर गुन्हेगार अनेकदा इतर देशांतून काम करत असल्यामुळे या आव्हानांना तोंड देण्यासाठी बहुआयामी दृष्टिकोन आवश्यक आहे. त्यामध्ये नवीन कायदे करण्यासह असलेली धोरणे अधिक मजबूत करणे, सायबरसुरक्षेत अधिक गुंतवणूक करण्यावर भर द्यावा लागेल,' याकडे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी लक्ष वेधले.

इंडियन ओ

सिक्युरिटायझेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑ

ज्याअर्थी इंडियन ओव्हरसीज बँकेचे अधिकृ
अँण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅ
संबंधित कर्जदारांकडून बँकेला येणे असलेली
करण्याच्या हक्काला अनुसरून, आणि ज्याअ
करण्यासाठी खाली नमूद केलेल्या मालमत्तां
यांच्यामार्फत https://baanknet.com/e

| अ. क्र. | शाखा आणि खाते/ प्रमोटर्स/संचालक/ जामीनदार यांची नावे | एन व |
|---|---|---|
| १ | शाखा : औंध<br>**कर्जदार : मे. कॅडकॉम्प सिस्टीम्स् प्रा. लि.**<br>श्री. विनोद गोविंद कुलकर्णी **(संचालक) (जामिनदार आणि गहाणदार)**, श्री. रविंद्र गणेश कुलकर्णी, **(संचालक) (जामिनदार)**<br>मे. राडेक सिस्टीम्स् **(जामिनदार आणि गहाणदार)** | |

कलेक्शन खाते क्र. : 06690113

ही सूचना सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्स

पीएसबी अलयान्स (बँकनेट) नोंदणीकृ
(संपर्क फोन आणि ईमेल : ८२९१२२०२
https:

| ई-लिलावाचा प्रारंभ | बया ऑ |
|---|---|
| दिनांक : ३०.०१.२०२५<br>वेळ : स. ११.०० ते दु. ३.०० | |

दिनांक : १०/०१/२०२५
ठिकाण : पुणे

होम सेव्हड् ई-पेपर अकाउंट